मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२- २२७९४०९५
ई- मेल- tca-mh@nic.in

क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.२७/नों.शा.

दि.२६ नोव्हेंबर, २०२४

**विषय : पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे होंडा सिव्हीक वाहन विक्री करणेबाबत फेरजाहिरात सूचना.**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे असलेले होंडा सिव्हीक (Honda Civic) वाहन क्र. क्र.एमएच 01 एएन.9990 या चार चाकी वाहनाची विक्री करीता इच्छुक खरेदीधारकांची मोहोरबंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. यासंदर्भातील अटी व शर्ती व सर्व तपशीलवार माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(प.नं.बहुरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**१) परिचय :-**

महाराष्ट्रातील सर्व रंगमंचीय कलांचा प्रामुख्याने नाटय कलेचा विकास होण्यासाठी नाटय महोत्सवाचे आयोजन, शास्त्रीय संगीताच्या उत्कर्षासाठी शास्त्रीय संगीत नृत्य महोत्सवाचे आयोजन आणि लोककलेच्या विकासाकरिता तमाशा, लोककला महोत्सव तसेच मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन मिळावे म्हणून मराठी चित्रपट महोत्सवाचे प्रत्येक वर्षी आयोजन करण्यात येऊ लागले. या योजना राबविण्यासाठी हा स्वतंत्र विभाग सथापन करण्यात आला आहे.

या विभागाच्या नावे असलेला खालील मॉडेलचे वाहन विक्री करावयाचे असून, त्यासाठी इच्छूक खरेदीदारांकडून दरपत्रक मागविण्यासाठी सदरची जाहिरात देण्यात येत आहे.

**२) वाहनाचा तपशील खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | वाहनाचा तपशील |
|---|---|
| १. | Vehicle No. : MH 01 AN 9990 |
| २. | Model : HONDA CICIC 1.8 V AT |
| ३. | Engine No .:R18A19401960 |
| ४. | Chassis No: MAKFD163ACN500294 |
| ५. | Class : LMV |
| ६. | MFG CD : HONSCL |
| ७. | Product Year (Vehicle Purchase year) : 2012 |
| ८. | आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर : 46,114 KM |

**३) महत्वाच्या सूचना :**

कृपया वाहन खरेदी करण्यापूर्वी, दरपत्रक सादर करावयाच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

१. होंडा सिव्हीक (Honda Civic) वाहन क्र. क्र.एमएच ०१ एएन.९९९० या चार चाकी वाहनाची हातची किंमत विभागाने ठरवली आहे.
2. वाहनाची सर्वाधिक किंमत देणाऱ्या खरेदीधारकांची निवड करण्यात येईल.
3. उपरोक्त वाहन "**आहे त्या स्थितीत**" विक्री करण्यात येणार आहे.
4. वाहन पाहणी दरम्यान चालू स्थितीत आढळल्यास व दरपत्रकाची कार्यालयीन कार्यवाही करून वाहन ताब्यात देईपर्यंत, वाहन बंद पडल्यास वाहन कार्यालयाकडून चालू करून किंवा त्याचे आवश्यक ते कामकाज करून ताब्यात दिली जाणार नाहीत, याची खरेदीदारकांनी नोंद घ्यावी.
5. दरपत्रक सादर करणेकरीता कार्यालयाद्वारे नमुना तयार करण्यात आला असून, तो जाहिरातीच्या शेवटी प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदरच्या नमुन्यातच आपले दर नमूद करून दरपत्रक सादर करण्यात यावे.
6. दरपत्रक सादर करताना इसारा (EMD) रक्कम रू.२,०००/- चा डिमांड ड्राफ्ट सोबत जोडावा. डिमांड ड्राफ्ट " Under Secretary, Tourism And Cultural Department" या नावाने करावा.
7. निवड न झालेल्या दरपत्रकधारकास इसारा (EMD) रक्कम परत करण्यात येईल.

8. निवड झालेल्या दरपत्रकधारकाची इसारा (EMD) रक्कम बोली रकमेत समायोजित करण्यात येईल. निवड झालेल्या दरपत्रकधारकाने वाहन घेण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची इसारा (EMD) रक्कम त्यास परत केली जाणार नाही. ती रक्कम जप्त करण्यात येईल.
9. दरपत्रकामध्ये कोठेही खाडाखोड/ ओव्हररायटिंग/ पांढरी शाई लावणे टाळावे, तसे केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
10. वाहनाची पाहणी/ तपासणी करणेकरीता तसेच वाहनाची अधिक माहिती मिळविणेकरीता कार्यालयाच्या खालील नमूद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत संपर्क साधावा. अंतिम दिनांकानंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
11. खरेदीदाराने दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात खालील नमूद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत. त्यावर " MH-०१-AN-९९९० या वाहनासाठी दरपत्रक" असा स्पष्ट उल्लेख असावा.
12. पोस्टाने, कुरीयरद्वारे दरपत्रक पाठविण्यात येत असल्यास नमूद दिनांकापूर्वी कार्यालयास प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. तसेच ई-मेल अथवा वॉट्सॲपद्वारे दरपत्रके पाठवू नयेत.
13. खरेदीधारकास त्याची निवड करण्यात आल्याचे कळविण्यात आल्यानंतर दरपत्रकात नमूद रक्कम भरून एका आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे अत्यावश्यक राहील अन्यथा दरपत्रक रद्दबातल ठरविण्यात येईल.
14. दरपत्रकात सादर केलेल्या रकमेवर आवश्यक तो वस्तु व सेवा कर भरणा करावा लागणार आहे.
15. वाहनाची हस्तांतर नोंदणी व आवश्यक रोड टॅक्स रकमेबाबत सर्व निवड प्रक्रिया करण्यात आलेल्या खरेदीदारकास स्वखर्चाने करावी लागेल. तसेच आवश्यक तेवढा टॅक्स स्वखर्चाने करावा लागेल. वाहतूक नियम भंगाबाबत वाहनावर ई-चलान द्वारे दंड असल्यास त्याचा भरणा या विभागामार्फत करण्यात येईल.
16. निवड केलेल्या खरेदीधारकास वाहन खरेदीच्या अटी व शर्तीसह दरपत्रक मंजूरीचे पत्र ई-मेल किंवा पत्राद्वारे कळविण्यात येईल.

**४.) दरपत्रकधाराकांनी सादर करावयाची कागदपत्रे :**

1. खरेदीदाराचे दोन पासपोर्ट फोटो.
2. ओळखीचा पुरावा (पॅनकार्ड/आधारकार्ड/ पासपोर्ट/ मतदार ओळखपत्र इ. यापैकी कोणतेही एक.)
3. कंपनी/ फर्मच्या नावे वाहन खरेदी करावयाचे असल्यास त्याचे वस्तु व सेवाकर अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
4. इसारा (EMD) रक्कम रू.२,०००/- चा डिमांड ड्राफ्ट.

५. **दरपत्रक पाठविणेकरीता व उघडणेकरीता हजर रहावयाचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक :**

अवर सचिव (नोंदणी शाखा), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,

दालन क्र.१३२, मंत्रालय विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई.

भ्रमणध्वनी क्र.८३२९२५५१८३/९३२२१४७७५०/९५४५१२८८९५

६. **महत्वाच्या दिनांक व वेळ :**

1. दरपत्रके सादर करण्याची तारीख : २७/११/.२०२४ वेळ सकाळी ११.०० वा.
2. दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख : ०६/१२/२०२४ वेळ सायं.५.०० वा.
3. दरपत्रके उघडण्याकरीता तारीख : १०/११/ २०२४ वेळ सायं.३.०० वा.

**सदर निवड प्रक्रिया जाहिरात कोणत्याही वेळी/कोणत्याही कारणास्तव/ कोणत्याही टप्प्यावर/ पूर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा/ फेरबदल करण्याचा अधिकार या विभागाकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.**

**(प. नं. बहुरे)**
**महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव**

**दरपत्रक सादर करणेकरीता कार्यालयाद्वारे नमुना**

प्रति,

अवर सचिव (नोंदणी शाखा),

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,

मंत्रालय, मुंबई.

**विषय : पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे होंडा सिव्हीक वाहन विक्री करणेबाबत.**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | खरेदीदारकाचे नाव/ कंपनी/ फर्म असल्यास त्यांचे नाव | |
| २. | खरेदीदारकाचा पूर्ण पत्ता | |
| ३. | खरेदीदारक कंपनी असेल तर कंपनीचा पूर्ण पत्ता | |
| ४. | जाहिरातीनुसार वाहन पाहणी केल्याचा दिनांक | |
| ५. | इसारा (EMD) रक्कम भरल्याचा क्रमांक व दिनांक | |

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली जाहिरात संकीर्ण २०२४/ प्र.क्र.२७/ नोंदणी शाखा, दि.२६.११.२०२४ अन्वये सदरची दरपत्रक सादर करीत आहे. जाहिरातीमध्ये नमुद अटीं व शर्तीनुसार खालील नमूद केलेले वाहन त्यासमोर नमूद केलेल्या किंमतीस जसे आहे, त्या स्थितीत खरेदी करू इच्छितो. सदरचे वाहन खरेदी नंतर हस्तांतरण नोंदणीकरीता होणारा सर्व खर्च मी/ आम्ही स्वखर्चाने करणार आहे/ आहेत.

वाहन क्र. ----------------------------------------------

खरेदीदाराची रक्कम: --------------------------------------------

उपरोक्त वाहनाच्या वरील रकमेवर आपल्या कार्यालयाकडून आकारण्यात येणारा आवश्यक तो वस्तु व सेवा कर भरण्यास माझी संमती आहे.

जाहिरातीतधील नमूद सर्व सूचना, अटी व शर्ती मला/ आम्हाला मान्य आहेत.

आपला,

दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव व सही

संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक.